# सत्यशोधक विवाह पध्दती

**प्रा.डॉ. सुनिल चवळे**, एन.जे.पटेल महाविद्यालय, मोहाडी.

लग्न लावणारा ब्राम्हण हा घटक वगळून त्यांनी कुणीही लग्न विधी संघटित करू शकेल अशी साधी सोपी पध्दत मांडली. विशेष म्हणजे त्यांच्या मांडणीमध्ये स्त्रियांसाठी समता आणि स्वातंत्र या गोष्टीवर मुद्दाम भर दिला. विवाह हा पती–पत्नीच्या जीवनातील महत्वाचा प्रसंग आणि संस्कार आहे, तसेच पती–पत्नी हे दोघेही कुटूंबाचे आधार आहेत.

कुटूंब प्रमुखाची हुकूशाही आणि स्त्रियांची गुलामगिरी हा सामाजिक विषमतेचा आणि गुलामगिरीचा एक आधार आहे हा मुळ आधार तोडल्याशिवाय कुटूंबात स्त्री – पुरूषांमध्ये समानता येणार नाही. ही गोष्ट लक्षात घेवून विवाहा प्रसंगी वर – बधूंना स्त्रीपुरूष समानतेची जाणीव व्हावी म्हणून स्त्री स्वातंत्राचा पुरस्कार करणारी मंगलाष्टके फुल्यांनी तयार केली आणि त्यानुसार सत्यशोधक समाजाच्या मुलामुलींचे लग्न लावली.[१] लग्न म्हणजे एक मेकांच्या मदतीसाठी स्त्री पुरूष एकमेकांचे साथी होवून एक चित्ताने वर्तन करून एकमेकांच्या सुखासाठी केलेली वहीवट होय अशी व्याख्या महात्मा फुल्यांनी उदधृत केलेली आहे.

सत्यमेव जयते

सत्यशोधक समाजोक्त विवाहसंबंधी विधी

अथ

प्रात:काली प्रथम वर होणा–या मुलाने नाहाव्याकडून आपली चुंच करविल्यावर करवल्यांनी त्यास उटणें लावून तेलभ्यंग करून स्नान घालावे. नंतर, त्यांने आपल्या शिवारांत जाउन तेथे मुकरर केलेल्या जाग्यावर ....... पूजा करून घरी यावे. नंतर मंडपात ..... हळद लावून ... त्याच्या उष्टया हळदीबरोबर चिरडी, चोळी, फुलांची मंडवळी, हारगजरे व कोरडा शिधा वधूचे मंडपात पाठवून द्यावा. वधूस हळद लावून एकंदर सर्व स्त्री पुरूष व–हाडी मंडपात आल्यावर वराने गडगनेर घेण्यास सुरूवात करावी.

नंतर वरांने सोनाराकडून कुळस्वामीच्या टाकस उजाळा दिल्यानंतर, वराच्या कुळांतील एका पुरूषाने ..... डाव्या हातात ते पात्र घेवून उजव्या हातांत नागवी तरवार घेवून गांवाचे वेशीजवळ ... पूजा करून वाजतगाजत मंडपात परत आल्याबरोबर .... भोजन सर्वांनी यथासांग सारून.... गोंधळाच्या नांदात सर्व रात्रभर आनंद करावा.[२]

लग्नाचे दिवशी वराचे घरी मंडपात परटीणीने वस्त्राचे आसनावर ...... वरास बसवून........ हातांत कंकण बंधावे ....... वराने आपल्या परिवार व–हाडासह .... वधूचे गावात जावून .... बसावे. आणि तेथून वराने वधूस तयार होवून बसण्याकरीता सांगण्यास, वरधाव्यास वधूचे पालकाचे घरी पाठवावे......

वधूकडून आलेलया पोषाखासह ...... वधूंचे घराकडे .... मिरवत मिरवत जावे.

पुढे वधूच्या गावातील महारणीने हातात दीपताट घेवून वरमुलास ओंवाळून त्याची अलायबलाय घेतांच वरानें वधूचे मंडपात प्रवेश करून, प्रथम वधू वराने आपली व आपआपल्या पित्यांची नावे, आडनावे, कळवू सर्वांसमोर वधू वरामध्ये करारसबंधी करून घेण्याकरीता जातीचे पंचापासून परवानगी घ्यावी. आणि अंतरपट मधीं असतां, वधूने...... फुलांची माळ आपल्या हातात घेवून .... समोरासमोर उभे राहावे. पुढे वधू वरावर काही विघ्ने आल्यास ..... मामाचे हाती सस्त्रे देवून, त्यास आपआपले पाठराखे करावे आणि वर वधूने पाळीपाळीने मंगळरूपी करार वदण्याची सुरूवात करावी. वरवधु बिचारे विव्दान नसून लाजाळू दिसल्यास हया उभयतांस त्यांचे इष्टमित्रांनी मंगळे म्हणू लागण्यास सहाय करावे, परंतु वधुवराचे जातीस नीच मानून त्या सर्वास आपले सेवक, दास म्हणणा–या धूर्त, कपटी आर्यभट ब्राम्हणाची या कामी सावलीदेखील पडू देवू नये.[३]

।। (मंगळाष्टक) ।।

(वर)

देवाचे नियमां प्रमाण धरूनी, चाले तुझें कूळ गे ।।
सत्याने अवघ्यांत श्रेष्ठ असशी, तैसेच हे त्वत्सगे ।।

अज्ञान्या समदृष्टिने शिकविशी, तूं ज्ञान त्या दाविशी ।।
प्रितीनें वरितों तुला अजि तुझी, ऐकून कीर्ति अशी ।।
शुभमंगल सावधान ।।१।।

(वधु)

मानीशी जरी त्वा दिले अनुदिनी, कर्त्या समाधानसे ।।
आम्हां सर्व स्त्रिया असे बहु, पिडा, हे नेणशी तूं कसे ।।
स्वातंत्रानुभवाचि ओळख आम्हां, झाली नसे मानशी ।।
यासाठी अधिकार देशिल स्त्रियां, घे आण त्यांची अशी ।।
शुभमंगल सावधान ।।२।।

(वर)

स्थापाया अधिकार मी झटतसे, या बायकांचे सदा ।।
खर्चाया न मनी भी मी किमपिही, सर्वस्व माझे कदा ।।
मानीतो सकला स्त्रियांस बहिणी, तु एकली माप्रिया ।।
कर्त्यांचे भय मी मनांत तुजला, ठेवीन पोसावया ।।
शुभमंगल सावधान ।।२।।

चवथ्या मंगळाष्टकाचे तिसरे पद पुरें होतांच ............. गळयांत फुलांची माळ घालतांच, वराने वधूचे उजवे हाताचे बोटात अंगठी... उभयतांकडील परिवारासह ............. आशिर्वदरूपी पांचवे मंगळाष्टक म्हणून वधुवरास पुष्पवृष्टी करीतोपावेतो तेथेच उभे रहावे.[४]

(वधु)

बंधुवत्मजला समस्य असतो, त्वद्भिन्न जे की नर ।।
आज्ञाभंग तुझा करीन न कदा मी सत्य कर्त्यावर ।।
ठेवोनी अवघाचि भार झटुंया, लेकां कराया हिता ।।
हाताला धरूनी तुला वरितसे, सर्वापुढे मी अतां ।।
शुभमंगल सावधान ।। ४।।

सर्व स्त्री पुरूषांनी म्हणावयाचे मंगळाष्टक

आधारा बहु मानिजे आपुलिया, मातापित्यांचे सदा ।।
मित्रांचे तुमच्या तसेच असती, जे इष्ट त्यांचे वदा ।।
वृध्दा पंगु सहाय द्या मुलिमुलां, विद्या तया शिकवा ।।
हर्षे करा फुलांची अवघे, टाळी आता वाजवा ।।
शुभमंगल सावधान ।। ५।।

पुष्पवृष्टी झाल्याबरोबर वधुवरांनी, आपल्या उत्पन्न कर्त्यासहित आपल्या कुळस्वामीचे चिंतन करू लागावे.... [५]

आर्शिवाद

वधुवरा हया बहु शक्ति द्याया ।
समर्थ तो जोचि जागा करी या ।।
सुबुध्दि, विद्या, बल आणि भुती।
दया तयाच्याचि कृपें करोति ।।

.......... इतक्या समोरासमोर दोन चवरंग........ वधुवरांस बसवून चंदनांची लाकडे पेटवून ..........महापूजा करण्यास आरंभ करावा.

पूजा

सत्यमेव जयते

आकाशनिर्माणकर्त्रे नमः तेजनिर्माणकर्त्रे नमः वायुनिर्माणकर्त्रे नमः
उदकनिर्माणकर्त्रे नमः पुथ्वीनिर्माणकर्त्रे नमः सुर्यनिर्माणकर्त्रे नमः
चंद्रनिर्माणकर्त्रे नमः मर्कटनिर्माणकर्त्रे नमः अणुरेणुनिर्माणकर्त्रे नमः
पर्जन्यनिर्माणर्त्रे नमः अश्वनिर्माणर्त्रे नमः कीटकनिर्माणकर्त्रे नमः

बुध्दिमान प्राणीनिर्माणकर्ते त्रे नमः शुध्दविचारारनिर्माणकर्त्रे नमः
ब्रम्हराक्षसनिर्दाळणकर्त्रे नमः स्नानं समर्पयामि, पंचमृमस्नांन समर्पयामि…
पुष्पं समपर्पयामि….. शूद्रविव्दानाय दक्षिणा समर्पयामि
पूजा पुरी होताच … कच्च्या सुतानें वेष्टून मर्यादा करावी आणि त्या मर्यादेच्या आत वधुवरांनी सर्वासमक्ष प्रतिज्ञा करावी ती येणेप्रमाणे….[६]

वर ( शपथ )

आजपासून मी तुला माझी भार्या कबूल करून, जात पंचासमक्ष मी प्रतिज्ञा करीतों, तशी अशी की —— आजपासून मी, तुला या सूतभर मर्यादेइतकी देखील जागा सोडून तुझाबाहेर जाणार नाही, म्हणून आपल्या उत्पन्नकर्त्यासहीत कुळस्वामीस स्मरून प्रतिज्ञा करतो.

वधु ( शपथ )

आजपासून मी तुला भ्रतार कबूल करून, जात पंचासमक्ष मी प्रतिज्ञा करीतें ती अशी की, —— आज पासून मी तूला या सूतभर मर्यादेइतकी देखील जागा सोडून तुझाबाहेर जाणार नाही म्हणून आपल्या उत्पन्नकर्त्यासहित कुळस्वामीस स्मरून प्रतिज्ञा करीते.

प्रतिज्ञा केल्यानंतर ………… वधूस वरांचे उजवे बाजूला शेजारी बसवून …… कन्यादान करून त्यास नमस्कार केल्याबरोबर वधुवरांनी, आपले जातींतील मुलिमुलें शिकविण्याकरीता जातफंडास महादक्षिणा देवून आपल्या जात पंक्तीबरोबर बहुल्यावर एके ताटांत जेवण घ्यावयास जावें…… मोठया विनयपुर्वक व नम्रतेंने वधूस वराचे ओसांगळी घातल्याबरोबर, वराचे वधुसह व—हाडास बरोबर घेवून मोठया आनंदाने शुद्रदि अतिशुद्रांपासून तो ख्रिस्ती, मुसलमान, पार्शी, ब्राम्हण वगैरे मानव बांधवांपावेतो कोणाची आवड निवड न करीता त्यांच्यातील पोरक्यां मुलीमुलांस व अंधपंगूस शकत्यनुसार दानधर्म करीत आपल्या गावी जावे.

**<u>इति सत्यशोधक समाजोक्त लग्नसंबंधी विधी स्माप्त</u>** [७]

प्रस्तुत लग्न विधीचा आशय महत्वपूर्ण आहे यामध्ये मूल्यभान तर आहेच, पण शूद्राती शूद्रांना शोषणातून मुक्त करण्याचा हेतू आहे. निरर्थक मंगलाष्टकापेक्षा स्वाहित व समाज हित, स्त्री पुरूष समता, व्यभिचार मुक्त सुखी जीवन जगण्याचे भान देणारी ही विधी आहे. भ्रट, ब्राम्हण, ग्राम जोशी शूद्रांच्या लग्नामध्ये उपस्थित राहून वेगवेगळया प्रसंगी दक्षिणा आणि शेवटी मांडव खंडणी घेत असत. त्यामुळे शुद्राची खूप नाडवणूक होत असते ते शोषण थांबविण्यासाठी शुद्राच्या लग्नात भट—जोशांचे काही काम नाही. आमची लग्ने आम्ही लावू अशी भूमिका सत्यशोधकानी घेतली. शिवाय ब्राम्हण आपल्या मंगलाष्टकामध्ये नद्या, आकाशातील ग्रह यांची नावे निरर्थक गोवातात. म. फुले यांनी अर्थ पूर्ण मंगलाष्टके रचली, ही मंगलाष्टके वर वधुने अनुक्रमे एक एक अशी दोनदा म्हणावयाची आहेत, उपस्थित स्त्री पुरूषांनी म्हणावयाची आहेत. आपण काय म्हणत आहोत, ते समजून घेणे आणि म्हटल्याप्रमाणे, प्रतिज्ञेप्रमाणे आचरण करायचे आहे, या पूजा विधीत अक्षता म्हणून होणारी अन्नधान्याची नासाडी टाळली आहे. शेवटच्या मंगलाष्टका नंतर सर्व स्त्री पुरूषांना वधूवरांना आशीर्वाद द्यावयाचा आहे.

पूजेच्या वेळी म्हणावयाच्या मंत्रात सृष्टी सर्व प्राणी मात्र, वृक्ष वेली, जीव जंतू, मानवांचे सर्व शरीर अवयव, सृष्टी वरील सर्व उपभोग पदार्थ निर्माण करणा—या निर्मिकाला नमुद केलेले आहे. शेवटी वराने आणि
वधुने गद्यात शपथ घेवून आपले जीवन सुखी होण्यासाठी एकमेकांना विश्वासात घेवून जगण्याचे आश्वासन आहे.

म. फुले यांच्या मते लग्न हा वधू — वराने परस्परांशी केलेला पवित्र करार असतो. सत्याने, समदृष्टीने परस्पराशी आणि समाजाशी वागण्याची ती प्रतिज्ञा असते स्वतःची प्रगती, स्वकुटुंबाची प्रगती आणि समाजाच्या विकासासाठी झटण्याचा तो निर्धार असतो. दोन व्यक्तीमुळे दोन कुटूंबाचे आणि पुन्हा दोन्ही कुटूंबाच्या नात्यांच्या माणसांचे परस्परांशी नाते सबंध प्रस्तापीत होत असतात, कोणी कोणावर खर्चाचे ओझे लादु नये ही माणुष्कीची भावना आहे. सत्यशोधक समाज जोक्त पूजा विधी मधील नमन वगैरे भाग झाल्यावर, वर—वधू यांची शपथ झाल्यावर, मानपान, भोजन, भेटी हे जिव्हाळयाचे कार्यक्रम आहेत. फुले यांनी स्वतंत्र पूजा विधी ब्राम्हण द्वेषा पायी

सांगितली नाही तर शोषणाला विरोध करण्यासाठी. अनाथ मुली मुलांना दान धर्म करावा गरजू, दुबळे, पोरके अपंग यांच्या विषयी भेदा भेद करू नये. त्या काळात ब्राम्हणांनी समाजाचे जे शोषण चालविले होते, त्याविषयी त्यांनी भुमिका घेतली होती. ही भूमिका चुकीची होती असे म्हणता येत नाही. कोणीही कोणाचे शोषण करणार नाही याची काळजी ते घेतात. महात्मा ज्योतीबा फुले यांचे विवाह विषयक विचार स्त्रीमुक्तीकडे घेवून जाणारे आहे.

संदर्भग्रंथ सुची :—

१) फडके य.दि. महात्मा फुले समग्र वाडमय : प्रकाशक सचिव महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृति मंडळ,मुंबई २००६, पृ.४३४
२) कित्ता पृ. ४३४
३) फडके य. दि उपरनिर्देशीत पृ. ४३४
४) कित्ता पृ. ४३४
५) उपरोक्त पृ. ४३७
६) उपरोक्त पृ. ४३९